# महाराष्ट्र राज्यातील लॉटरीची वाटचाल

सुमारे ३७ वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्य शासनाने राज्य लॉटरी चालवण्याचा निर्णय एका निराळ्याच संदर्भात घेतला. सन १९६८-६९ च्या सुमारास मुंबई शहर आणि आसपासच्या भागात 'मटका' नावाचा जुगार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर खेळला जात होता आणि त्यात बरेचसे गोर-गरीब लोक भाग घेत होते. या जुगाराच्या खेळात गोर-गरिबांची मोठीच पिळवणूक होत होती. पैशाच्या अभिलाषेने सामान्य माणूस नादावला आणि नाडला जात होता. त्या जुगाराला काही अंशी आळा घालता यावा आणि त्याचबरोबर जनतेचा पैसा वाया न घालविता त्यातून राष्ट्र उभारणीच्या कार्यास काही निधी उभा करावा, या दुहेरी उद्देशाने कै. वसंतराव नाईक यांच्या पुढाकाराने १२ एप्रिल १९६९ रोजी 'गजलक्ष्मी' या बोधचिन्हासह महाराष्ट्र राज्य लॉटरीचा शुभारंभ झाला. विकासात्मक कामासाठी वित्तपुरवठा करण्याच्या हेतूने महाराष्ट्र सरकारने १९६९ साली वित्तविभागाच्या अखत्यारित लॉटरी बोर्डाची स्थापना केली. लॉटरीचं आयोजन लघुबचत आयुक्त आणि राज्य लॉटरी यांच्या वतीने होऊ लागलं.

महाराष्ट्र राज्य लॉटरी अस्तित्त्वात आल्यानंतर महिन्यातून केवळ एक सोडत होत असे. त्यानंतर त्या वाढत जाऊन ५, १५ आणि २५ तारखेला अशा महिन्यातून तीन सोडती होऊ लागल्या. सध्या लॉटरीचे दैनंदिन, साप्ताहिक आणि मासिक लॉटरी असे वर्गीकरण झाले आहे. शिवाय बंपर ड्रॉ वेगळेच. साप्ताहिक लॉटरींमध्ये सागर लक्ष्मी, पद्मिनी, अक्षय, पुष्कराज, वैभव लक्ष्मी आणि महाराष्ट्र लक्ष्मी यांच्या सोडती सोमवार ते शनिवार अशा सप्ताहात विविध दिवशी होत असतात. आकर्षक पुष्कराज ही मासिक सोडत असते. बंपर लॉटरीसाठी प्रजासत्ताक दिन, गुढी पाडवा, महाराष्ट्र दिन, दिवाळी, महाराष्ट्र नाताळ, आणि श्री भव्यतम (गणेशोत्सव) या सोडती असतात.

लॉटरीच्या वाटचालीच्या सुरुवातीस महिन्यातून एक, कालांतराने महिन्यातून दोन, नंतर महिन्यातून तीन अशाप्रकारे लॉटरीच्या सोडती काढण्यात येत असत. महाराष्ट्र राज्य लॉटरीची सुरुवात तर दिमाखात झाली, परंतु मुख्य लॉटरीचा मटका जुगारावर म्हणावा तितका प्रभाव पडत नसल्याचे आढळून आले. त्यावर उपाय म्हणून मग दिनांक १ मार्च १९७४ रोजी 'मिनी' लॉटरी चालवण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला. सुरुवातीला एक दिवसाआड मिनी लॉटरीची सोडत काढण्यात येत असे. या मिनी लॉटरीच्या तिकिटाची किंमत अवघी ५० पैसे इतकीच होती. शिवाय बक्षिसे अधिक असल्यामुळे ही लॉटरी कमालीची लोकप्रिय झाली. सुरुवातीला या मिनी लॉटरीची तिकिटे फक्त मुंबईतच विक्रीला होती. कालांतराने ती सर्व जिल्ह्यात विकली जाऊ लागली. दिनांक १ ऑगस्ट १९७५ पासून मुख्य सोडतीचे आणि सुट्यांचे दिवस वगळून कामाच्या इतर सर्व दिवशी

मिनी लॉटरीची सोडत काढण्याचा निर्णय घेण्यात आला. १९८०-८१ साली दर गुरुवारी आठवड्याची मुख्य सोडत आणि महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी मासिक भव्य सोडत काढण्याचा निर्णय घेण्यात आला आणि तीच पद्धत पुढे चालू राहिली.

पहिल्या नऊ वर्षातच या महाराष्ट्र राज्य लॉटरीने सुमारे ३० कोटी रुपयांची भर राज्याच्या तिजोरीत घातली. सोळाव्या वर्षी ही रक्कम ६५ कोटींवर गेली. लॉटरीद्वारे मिळालेला हा सर्व पैसा निरनिराळ्या विकासकार्यावर खर्च करण्यात आला. राज्यात बांधलेली धरणे, पाणीपुरवठ्याच्या योजना, रस्ते, शेती विकासाच्या योजना, आरोग्यधामे व दवाखाने, शाळा अशा अनेक विधायक कामांसाठी लॉटरीतून उपलब्ध झालेला हा निधी कामी आला.

पहिल्या नऊ वर्षात बक्षिसांच्या रूपाने जवळ जवळ २५ कोटी रुपये वाटण्यात आले. लॉटरीच्या सोडतीसाठी जे पंचमंडळ नियुक्त केले जात असे त्यात समाजातील मान्यवर व जबाबदार व्यक्तींचा समावेश असे. त्यांच्या हस्तेच प्रत्येक सोडतीची संपूर्ण कार्यवाही पार पाडली जात असे. शासकीय तसेच खाजगी क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकारी, ख्यातनाम लेखक, कवी व कलावंत, चित्रपट व नाट्य अभिनेते तसेच थोर सामाजिक कार्यकर्ते यांनी पंच म्हणून काम केल्याने महाराष्ट्र राज्य लॉटरीची प्रतिमा उंचावली.

महाराष्ट्र राज्य लॉटरीचा पाया दृढमूल करण्याकरिता आणि सोडत प्रक्रियेतील पारदर्शकता लोकांना पटवून देण्याकरिता मुंबई खेरीज महसूल विभागाची मुख्यालयं, जिल्हा मुख्यालयं आणि जिल्ह्यातील आणि मोठी शहरं इत्यादी ठिकाणी लॉटरीच्या सोडती काढल्या जात असे. मुंबईत या लॉटरीची ६० टक्के विक्री होत होती आणि आजही मुंबई शहर हीच लॉटरीची मोठी बाजारपेठ आहे. तरीही ग्रामीण भागावर लॉटरी संचालनालयाने महत्त्वपूर्ण लक्ष घातले. तेव्हा दर महिन्याच्या तीन मुख्य सोडतींपैकी १५ तारखेस होणारी सोडत ही मुंबईबाहेर निरनिराळ्या जिल्ह्यांतून घेण्याची कल्पकता दाखवली गेली. त्याचा चांगला परिणाम असा झाला की जिल्ह्यातील तसेच ग्रामीण भागातील जनतेला लॉटरीची कार्यवाही प्रत्यक्षपणे पाहणे सुलभ झाले. अनेक तालुक्यांच्या ठिकाणीही या सोडती झाल्या.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांतील तसेच अंध, अपंग, निवृत्त, वृद्ध, शारीरिकदृष्ट्या दुर्बल वर्गांतील हजारो स्त्री-पुरुषांना व मुलांना लॉटरीमुळे उदरनिर्वाहाचा व्यवसाय लाभला आहे. अनेक एजंटांनी या व्यवसायाची पद्धतशीर आखणी करून तो उत्तमप्रकारे चालविला आहे.

लॉटरी तिकिटांच्या छपाईच्या बाबतीत शासकीय मुद्रणालय, विविध प्रसिद्धी माध्यमांचा

वापर करून ती जनतेपर्यंत पोहचवणारे माहिती जनसंपर्क महासंचालनालय, तिकिटाच्या एजंटांना वाटप व बक्षिसाच्या मोठ्या रकामंचे त्वरित वितरण करणाऱ्या मुंबईतील अधिदान व लेखा कार्यालय, तसेच जिल्ह्यातील कोषागरे व उपकोषागरे आणि लॉटरी संचालनालय यांचे योगदान आहे.

पहिल्या दहा वर्षात वर्षाकाठी किमान तीनदा भव्य सोडती व्हायच्या. हे लॉटरी ग्राहकांचे मोठेच आकर्षण ठरले होते. या भव्य सोडतीत पाच लाख रुपयांपर्यंतच्या रकमांची सामाईक बक्षिसे वाटण्यात यायची. तेव्हा हे पाच लाख रुपये प्रचंडच होते. १००१व्या सोडतीसाठी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या इतिहासात प्रथमच १० लाख रुपये इतक्या रकमेचे सामाईक बक्षीस ठेवले गेले. ही रक्कम प्रचंड म्हणून चांगलीच नावाजली गेली होती. एकूण १ कोटी रुपयांची तिकिटे तेव्हा छापली गेली आणि बक्षिसाची रक्कम म्हणून ३३ लाख ७८ हजार रुपयांची २,२२,३४८ बक्षिसे वितरित करण्यात आली.

सुरुवातीला लॉटरी खरेदीचा उत्साह होता तो कमी होताना दिसला, याचं कारण बक्षिसांची संख्या कमी होती. त्यानंतर बक्षिसांची संख्या वाढवण्यात आली. जेवढा फायदा सरकारला होत होता तेवढ्याच रकमेची बक्षिसे वाटण्यास सुरुवात झाली आणि मग लॉटरी ग्राहकांचा उत्साहही वाढताना दिसला. पहिल्या वर्षी बक्षिसांच्या रकमेचे प्रमाण २९:८३ असे होते नवव्या वर्षी हे प्रमाण ४१:४६ हे होते.

सुरुवातीच्या काही सोडती वगळता इतर सोडतींकरता वेळोवेळी जी बक्षीसरचना आखण्यात आली आहे ती अत्यंत तर्कशुद्धतेने करण्यात आली. बक्षिसाची रचना आखताना तिकिटे खरेदी करणाऱ्या लोकांना मिळणारी बक्षिसाची एकूण रक्कम, एजंटांना देण्यात येणारे कमिशन व बोनस आणि शासनाला मिळणारा निव्वळ नफा या बाबतीत नेहमीच समतोल राखण्यात आला. इतकेच नाही तर राज्य शासनाने तिकिटांच्या खरेदीदारांना नेहमीच झुकत्या मापाने बक्षिसाची रक्कम देऊ केली आहे. हे करत असताना बक्षिसाची आकर्षकता, त्याचबरोबर तिकीटांची विक्री, तिकिटे खरेदी करणाऱ्यांचा वर्ग आणि लॉटरीकडे त्यांचा बघण्याचा दृष्टिकोन व त्यांची अपेक्षा या सर्व बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य लॉटरीची बक्षीसरचना ही इतर राज्य लॉटरींच्या बक्षीसरचनेपेक्षा नेहमीच आगळी वेगळी राहिली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनावर राज्याच्या बाहेर जाऊन तिकिटे विकण्याची वेळ आली नाही. राज्याच्या बाहेर अधिकृत एजंट नेमून तिकीटविक्री करायची नाही असं महाराष्ट्र सरकारचं धोरण राहिलं आहे.

सुरुवातीच्या पंधरा-वीस वर्षातच राज्याच्या अधिकृत लॉटरी एजंटांची संख्या १५००

च्या वर गेली. प्रत्यक्ष तिकीट विक्री करणारे १० ते १५ हजार लोक या लॉटरी व्यवसायात गुंतलेले होते. मुख्य एजंटला १५ टक्के, मिनी लॉटरीला १० टक्के असे कमिशन तेव्हा दिले जायचे.

**कसोटीचे क्षण**

एप्रिल १९८३ पासून देशातील इतर राज्यांच्या लॉटरीच्या संयोजकांनी महाराष्ट्र राज्यात तिकिटांची विक्री सुरू केली आणि काही संयोजकांनी महाराष्ट्र शासनाने इतर राज्यांच्या तिकिटांच्या विक्रीवर जी बंदी घातली होती तिला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने इतर राज्य शासनानी लॉटरीची तिकिटे महाराष्ट्र राज्यातून मुक्तपणे विकता येतील असा निर्वाळा दिला. तेव्हापासून इतर राज्यांची तिकिटे राज्यातील मोठ्या शहरातून विकली जाऊ लागली. परंतु राज्यातील जनतेने महाराष्ट्र राज्य लॉटरीवर दृढविश्वास दाखवल्यामुळे परिणाम होण्याऐवजी मागणी वाढली आणि मिनी लॉटरीच्या सोडतीसाठी ५ लाखांऐवजी ६ लाख तिकिटे आणि मुख्य सोडतीची दर आठवड्याला २४ लाखांऐवजी ३० लाख तिकिटे काढावी लागली. शिवाय मासिक भव्य सोडतीच्या बक्षीसरचनेत आकर्षक बदल करून तिकिटांची संख्या ४० लाखांपर्यंत वाढवली आणि त्यातील सामायिक बक्षीस ११ लाख रुपये करण्यात आले.

राज्य लॉटरीची उद्दिष्टे जनमानसापर्यंत पोहचवण्याच्या उद्देषाने त्याचप्रमाणे लॉटरीचे महत्त्व आणि फायदे अधिक प्रमाणात लोकप्रिय होण्याकरिता शासनाने सप्टेंबर १९८५ मध्ये एक खुली भित्तीपत्रक स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेला राज्यातून उत्तम प्रतिसाद मिळाला. राज्यातील सुमारे ४५० हून अधिक कलाकारांनी यात भाग घेतला. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट भित्तीपत्रकास २,५०० रुपयांचे पहिले बक्षीस देण्यात आले. 'तुमच्या एक रुपयावर शून्ये आमची, ही किमया लॉटरीची' अशी ओळ त्या भित्तीपत्रकावर होती. श्री. के. जी. गोठाणे या नागपूरच्या चित्रकाराला हे पारितोषिक मिळाले.

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकिटांच्या काटेकोर छपाईबरोबरच त्यावरील रेखाटने हीही विशेष उल्लेखनीय बाब होती. अनेक ज्येष्ठ चित्रकारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकिटाचीसाठी रेखाटने केलेली आहेत. चित्रकार दलालांची रेखाटने असलेली लॉटरीची तिकिटे आजही अनेकांच्या संग्रहात आहेत. महाराष्ट्राचा सांस्कृतिक, सामाजिक तसेच कलात्मक वारसा तसेच आधुनिक औद्योगिक वाटचाल आणि कृषीक्रांतीचाही उद्‌गार या लॉटरीच्या तिकिटावरील रेखाटनातून व्यक्त झाला आहे. बालगंधर्वांपासून ते मृणाल कुलकर्णीपर्यंत अनेक कलावंतांची छबी लॉटरीच्या तिकिटावर साकारली गेली आहे. कलावंतांचा सन्मान रसिक करतातच परंतु लॉटरीच्या तिकिटावर झळकणं ही एकप्रकारे त्या कलावंताच्या सर्वसामान्यांमधील लोकप्रियतेची पावतीच असायची.

महाराष्ट्रात लॉटरी जरी लोकप्रिय असली तरी इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातून लॉटरीचा महसूल कमी येतो. म्हणूनच लॉटरी नियमन कायदा, २००० नुसार सरकारने दोन डिजिटची लॉटरी जुलै २००१मध्ये सुरू केली. या टूडी लॉटरीच्या आयोजनासाठी वेगळ्या उपसंचालकांचं कार्यालय थाटलं गेलं. सध्या ४८ टूडी गेम्स महाराष्ट्र सरकार आयोजित करते. या दोन संचालकांच्या लॉटरीतून महाराष्ट्राला दरवर्षी अंदाजे ५० कोटींचा महसूल मिळतो.

## कागदी लॉटरी आणि ऑनलाइन लॉटरी

तंत्रज्ञानामुळे अनेक सुविधा निर्माण होत असल्या तरीही तंत्रज्ञानाच्या झपाट्यात काही गोष्टींमध्ये बदल होत असतात. त्यामुळे या बदलाला अनुकूल नसलेल्या लोकांचा तंत्रज्ञानाला नेहमीच विरोध होत असतो. टांगेवाल्यांनी सुरुवातील स्वयंचलित वाहनांना असाच विरोध केला होता. टीव्ही आल्यामुळे लोक नाटक-सिनेमांच्या थिएटरमध्ये गर्दी करणार नाहीत असाच समज होता. इंटरनेट किंवा बातम्यांची चॅनेल आल्यामुळे लोक वर्तमानपत्र वाचायचं सोडतील असाही अपप्रचार केला गेला होता. पण यापैकी काहीच झालं नाही. उलट स्पर्धेला पोषक वातावरण निर्माण झाल्यामुळे दर्जात्मक मूल्य वाढत गेलं.

त्यामुळेच ऑनलाइन लॉटरी ही कागदी लॉटरीच्या मुळावर येणार असा पवित्रा घेऊन अनेकांनी त्याविरोधात दंड थोपटले. ऑनलाइन लॉटरीने अनेक सुविधा बहाल केल्या आहेत. ऑनलाइन लॉटरी आल्यानंतर कागदी लॉटरीवर अवश्य विपरित परिणाम झाला. मात्र तो वाढत्या स्पर्धेमुळे होतो तेवढाच. ऑनलाइन लॉटरीमुळे राज्याच्या तिजोरीतला महसूल वाढला. मात्र कागदी लॉटरीचा महसूल १२ कोटींवर येऊन घसरला. अर्थात त्यामुळे कागदी लॉटरी बंद झाली असं काही झालं नाही. तरीही या स्पर्धेला कागदी लॉटरी विक्रेत्यांची मानसिक तयारी नव्हती हे मात्र नक्की.

ऑनलाइन लॉटरीचे जगभर आज ५ लाख रिटेल आऊटलेट्स आहेत. ऑनलाइन लॉटरी या संगणक टर्मिनलच्या इलेक्ट्रॉनिक महाजालाने बांधलेल्या असतात. भारतात ऑनलाइन लॉटरी अल्पावधीतच लोकप्रिय झाली. भारतातील लोकप्रियता पाहता येत्या काही वर्षात भारतातही ५ लाख रिटेल आऊटलेट्सची आवश्यकता निर्माण होणार आहे. एवढंच नाही तर जागतिक लॉटरीच्या क्षितिजावर सुमारे ८० ते ९० टक्के भारतीय ऑनलाइन लॉटरीचं वर्चस्व राहू शकेल.

महाराष्ट्र शासनानेच सप्टेंबर २००२ मध्ये महाराष्ट्र ऑनलाइन लॉटरीची जाहिरात करत रिटेलर्स आणि व्यापाऱ्यांसाठी भरपूर कमाईची संधी अशी घोषणा केली होती. लॉटरीचे

आयोजन करणाऱ्या सर्व राज्यांसाठी ऑनलाइन लॉटरीचा पर्याय ठेवला होता. किरणा दुकानं, डिपार्टमेण्टल स्टोअर्स, शोरूम्स, केमिस्ट आदी ठिकाणी रिटेलर बनण्यासाठी आवतण दिलेलं होतं. त्यायोगे अनेकांनी आपली गुंतवणूक ऑनलाइन लॉटरीत केलेली होती. आज महाराष्ट्रात पाच ते दहा हजार टर्मिनल्स आहेत. आणखी अनेक टर्मिनल्स निर्माण होत आहेत.

गेल्या ३७ वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्य लॉटरीने यशस्वी आणि दमदार वाटचाल केली आहे. या वाटचालीमध्ये आलेल्या अनेक चढउतारांमध्येही ही लॉटरी टिकून राहिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीत या लॉटरीमुळे येणाऱ्या गंगाजळीमुळे मोठीच भर पडत आलेली आहे. त्यातून अनेक प्रकल्पांना मदत मिळाली आहे.